RNI No. MAHBIL/2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक १२] शुक्रवार, मार्च २६, २०२१/चैत्र ५, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक १७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

नगरविकास विभाग

४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ मार्च २०२१

अधिसूचना

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

क्रमांक: एमयूएम २०१८/प्र.क्र.१७२/नवि-१७.— ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ६ चे पोट-कलम (१) मधील खंड (क) तरतुदीनुसार व त्याअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार नगरविकास विभाग क्रमांक एमयूएम २०१८/प्र.क्र.१७२/नवि-१७, दिनांक १६ ऑक्टोबर २०२०, याद्वारे **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग एक-अ मध्य उप विभाग, दिनांक १६ ऑक्टोबर २०२०, यामध्ये उद्‌घोषणा प्रसिद्ध केली असून, महाराष्ट्र शासनाने अनुसूची “अ” मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राचा समावेश करून नांदेड जिल्ह्यातील मुदखेड या नगरपरिषदेची हद्दवाढ करण्याबाबत अधिसूचना काढण्याचा हेतू जाहीर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त उद्‌घोषणेस अनुलक्षून जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे विहित कालावधीत प्राप्त हरकती व सूचनांचा शासनाने विचार केला आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुच्छेद २४३ थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राचा समावेश करून मुदखेड नगरपरिषदेच्या सीमांमध्ये फेरफार करणे इष्ट वाटते ;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ६ चे पोट-कलम (१) मधील खंड (क) अन्वये प्रदान केलेल्या व इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे अनुसूची “अ” मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राचा समावेश करून मुदखेड नगरपरिषदेच्या सीमांमध्ये फेरफार करीत आहे. मुदखेड नगरपरिषदेच्या सुधारित सीमा अनुसूची "ब" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

अनुसूची "अ"

मुदखेड नगरपरिषद (जि.नांदेड) च्या हद्दीत समाविष्ट करावयाच्या स्थानिक क्षेत्राचा तपशील

मुदखेड गावाचे गट क्र. ९ ते १३, १६ ते १८, २० ते ३८, ४० ते १६०, १६२ ते १९०, १९२ ते २०५, २०७ ते ३५३, ३६२ ते ४५५, ५९९ ते ६५१, ६५८, ६६० ते ७९०, ८०२, ८०५, ८०९, ८१० ते ८३५, ८३७ ते ८४४,८४८ ते८५०.

मौ. न्याहाळी गावाचे गट क्र. २ ते ३८.

अनुसूची "ब"

मुदखेड नगरपरिषदेच्या सुधारित सीमा

उत्तर :- मौ. पार्डीची शीव, मौ. राजेवाडीची शीव, मौ.पिंपळकौठेची शीव.

पूर्व :- मौ.मेंड्क्याची शीव.

दक्षिण :- मौ. इजळीची शीव, मौ. चिकाळेची शीव, मौ.हाजीपुरची शीव, मौ. डोणगावची शीव.

पश्चिम :- मौ. मुगटची शीव, मौ. निवघ्याची शीव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शंकर जाधव,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th floor, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 26th March 2021.

NOTIFICATION

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUM-2018/C.R.172/UD17.— Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUM-2018/C.R.172/UD17, dated the 16th October 2020, published in the *Maharashtra Government Gazette,* Part-I-A, Extraordinary, Central Sub-Division, dated the 16th October 2020, the Government of Maharashtra had announced its intention to issue a notification, in exercise of the powers conferred by clause (*a*) of sub-section (*1*) of section 6 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah.XL of 1965), with a view to alter the limits of municipal area of the Mudkhed Municipal Council in Nanded District, so as to include therein the local areas specified in Schedule 'A' in the said Proclamation;

And whereas, the objections and suggestions received pursuant to the said Proclamation have been considered by the Government;

And whereas, having regards to the factors mentioned in clause (*2*) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considered it expedient to alter the limits of municipal area of the Mudkhed Municipal Council in Nanded District, so as to include therein the local areas specified in Schedule 'A' appended hereto.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of sub-section (*1*) of section 6 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby alters the limits of the municipal area of the Mudkhed Municipal Council in Nanded District, so as to include therein the local area specified in Schedule 'A' appended hereto and declares that the revised boundaries of the Mudkhed Municipal Council so altered shall be such as are specified in Schedule 'B' appended hereto.

Schedule 'A'

Description of the local area to be included in the limits of the Municipal area of the Mudkhed Municipal Council.

Mudkhed Gut No. 9 to 13, 16 to 18, 20 to 38, 40 to 160, 162 to 190, 192 to 205, 207 to 353, 362 to 455, 599 to 651, 658, 660 to 790, 802, 805, 809, 810 to 835, 837 to 844, 848 to 850.

Nyahali Gut No. 2 to 38.

Schedule 'B'

Revised Boundaries of the Mudkhed Municipal Council.

North :- Village Pardi Shiv, Village Rajewadi Shiv, Village Pimpal Kauthe Shiv.

East :- Village Mendka Shiv.

South :- Village Ijali Shiv, Village Chikala Shiv, Village Hajipur Shiv, Village Dongaon Shiv.

West :- Village Mugat Shiv, Village Nivgha Shiv.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHANKAR JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.